# जनता - सरकार - कायदा - न्यायालय
# माहितीचा अधिकार कायदा- २००५

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले.केवळ भारतीयांनी भारतातील जनतेसाठी सर्व स्तरावर काम करण्याचे सर्वार्थाने अधिकार म्हणजेच स्वातंत्र्य. स्वातंत्र्यानंतर अनेक कायदे अस्तित्वात आले. प्रामुख्याने भारतीय नागरिकास त्याच्या सर्वांगीण विकासासाठी कायदे एकमेकाशी सुटसुटीत करण्यात आले. आणि एवढे असूनही सर्व सामान्य जनतेला ''कायदा माझे संरक्षण करीत आहे'' असे मात्र वाटायला तयार नाही. कायदा ज्यांनी बनविला व बनविलेल्या कायद्याची ज्यांनी अंमलबजावणी करावयाची आहे, या प्रमुख स्थळांपासून सर्व सामान्य जनता हजारो मैल दुरच राहिलेली आहे. किंबहुना जवळ जाता येणार नाही. व गेलो तरी कायदा माझ्यासाठी वापरला जाणार नाही, अशी जनतेची भावना दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. आणि त्यामुळे जनता न्यायालयात जाणेच योग्य अशा निष्कर्षापर्यंत पोहचलेली आहे. तिथपर्यंत पोहचण्यासाठी जनता चारीबाजुंनी आणखी तोकडी पडत चाललेली आहे. आणि हे विदारक सत्य शंभर कोटीपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या भारत देशात दबा धरुन बसलेले आहे.

ह्याही परिस्थीतीत १२ आक्टोंबर २००५ रोजी भारताने चमत्कार घडविला आहे. आणि हा चमत्कार ९९.९९ टक्केपेक्षा जास्त जनतेला अद्यापही माहित पडलेला नाही. किंबहुना कायदा अंमलबजावणी करणाऱ्यांनी ह्या चमत्काराचे स्वरुप आम जनतेसमोर मोठ्या प्रमाणात उघड केलेले नाही. ही बाब चिंतेची व आव्हानात्मक आहे. तरी सुध्दा एकदा कायदा झाला तर तो बदले पर्यंत किंवा बदलला जाऊ नये यासाठी जनतेला जागृत करणे हे जनतेतील जनतेचेच कर्तव्य आहे, ह्याच जाणिविनेने **माहितीचा अधिकार कायदा २००५** जनतेच्या दरबारी नेण्याचे दायीत्व माझ्यासहीत आपण सर्वांनी स्विकारावे व त्याची पुढील कार्यवाही करावी असे आवाहन मी ह्या अग्रलेखात करीत आहे.

मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, तालुका पंचायत सदस्य, ग्रामपंचायत सदस्य व या जनतेचे जे प्रमुख आहेत ह्यांनाच सर्व अधिकार आहेत. ही समजुत कालबाह्य ठरवून भारत देशातील प्रत्येक नागरीकाला वरील सर्व लोकप्रतिनिधींचे अधिकार माहितीचा अधिकार कायदा – २००५ नुसार मिळालेले आहेत. परंतु मिळालेले हे अधिकार कसे, केव्हा , कुठे वापरायचे याचा थोडक्यात परामर्श सहकारामध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना करुन देण्यासाठी आजचे हे विश्लेषण आहे.

सहकारी संस्था ह्या कायद्याअंतर्गत समाविष्ठ आहेत किंवा नाही या वादात पडणे व्यर्थ आहे. महाराष्ट्र राज्याचे माहिती अधिकारी श्री. सुरेश जोशी यांच्या म्हणण्याप्रमाणे सहकारी संस्था सुध्दा या कायद्याअंतर्गत समाविष्ट झालेल्या आहेत. म्हणून आपल्या कारभारात पारदर्शकता ठेवण्यासाठी एक साधन म्हणून या कायद्याकडे सकारात्मक भावनेने

बघणे आवश्यक आहे.त्यासाठी माहिती लपविणे, माहिती न देणे हे कायद्यापेक्षा आपण आपला केलेला कारभार संशयाच्या भोवऱ्यात गुंतविण्याचा प्रकार आहे. व भविष्यकाळात आपल्याला त्या दिशेने म्हणजेच स्वयंपूर्ण होण्यासाठी व अचुक काम करण्यासाठी हा कायदा निश्चितपणे वरदान ठरणार आहे. ९९ टक्के सहकारातील कार्यकर्त्यांना पारदर्शकतेवर विश्वास आहे. अर्थात ह्याचा दुरुपयोग केला जाईल किंवा ब्लॅकमेलींग केले जाईल ह्या काळजीने ग्रासुन जाण्याचे काहिही कारण नाही. कारण आपले खरेपण व आपली कायद्याअंतर्गत कामकाजाची पध्दत ब्लॅकमेलींगने डगमगणार नाही. त्यामुळे कोणी माहिती मागितली ते गुप्ततेच्या नावाखाली जनतेची मालमत्ता व तिचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्याला टाळता येणार नाही हे सुत्र हळुहळू सर्वांच्या आंगी रुजेल.

या कायद्याचा सर्वात– सर्वार्थाने फायदा व अधिकार आपल्यासहित आम जनतेला प्राप्त होणार आहे. सहकारी संस्था नोंदणी अधिकाऱ्याला किंवा त्यांच्या वरिष्ठांना कुठल्याही प्रकारची माहिती विचारण्याचा अधिकार या कायद्याद्वारे सर्वांना मिळालेला आहे. व ही माहिती जास्तीत जास्त ३० दिवसाचे आत व कमीतकमी ४८ तासात मिळवून देण्याची तरतूद या कायद्यात केलेली आहे. आणि जर ही माहिती अयोग्य, अपूर्ण किंवा दिलीच नाही तर वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याकडे अपिल करण्याची तरतुदही या कायद्यात आहे. आणि यासाठी कुठल्याही वकिलाची किंवा कोणासही पैसे देण्याची आवश्यकता नाही. असा हा कायदा जनतेसाठी १२ आक्टोंबर २००५ पासुन भारत देशात लागु झालेला आहे. जो अधिकारी ही माहिती देण्यास किंवा अर्ज स्विकारण्यास कर्तव्यात कसुर करेल त्यास प्रत्येक दिवसासाठी रु. २५०/– दंड होण्यापासुन ते त्याची चौकशी होऊन त्यास पुढील शिक्षा करेपर्यंत या कायद्यात तरतुद करण्यात आलेली आहे.

परंतु ह्या माहिती कायद्यान्वये मिळालेल्या माहितीचा उपयोग जनतेच्या आणि / किंवा व्यक्तीच्या आर्थिक उत्थानासाठी कसा होणार आहे, याची जाणीवही भविष्यकाळात प्रत्येकाला समजणार आहे. उदा. मुंबई,पुणे, नागपुर इत्यादी प्रमुख शहरात ' नो पार्कींगच्या ठिकाणी' उभी केलेली वाहणे टोचन करुन वाहून नेणारे 'टोईंग' कोणाच्या मालकीचे आहे, त्यास हे कंत्राट कोणी, केव्हा व किती मुदतीपर्यंत दिले, त्याची टेंडरची जाहीरात कुठल्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली व येथुन पुढे होणार ही माहिती या कायद्याद्वारे मिळविली तर जे लोक वर्षानुवर्षे स्वत: किंवा सत्तेचा व पदाचा, तसेच पैशाचा दुरुपयोग करुन हे कंत्राट मिळवित होते. त्यांची ''मोनोपॉली''संपायला सुरुवात होणार आहे. मागील अनेक प्रकरणे उघडकीस येऊन मस्तवालपणे लाखो–करोडो रुपयांची कंत्राटे मालमत्तेप्रमाणे आपल्यालाच मिळविणारे आपोआप बिळामध्ये दडी मारुन बसणार आहेत.

राज्यातील टोल नाके, हमरस्त्यावरील कँटींगस्, शासकीय व निमशासकीय कंत्राटे, शासकीय अनुदाने, आश्रमशाळा, मेडीकल कॉलेजेस्, इंजिनीअरिंग कॉलेजेस्, शासकीय भुखंड, शासकीय व निमशासकीय भाडेपट्टीवरील जागा इत्यादी हजारो ठिकाणी या कायद्याच्या अंतर्गत ते काम आपणांस मिळण्यासाठी निश्चितपणे माहिती मिळविता

येईल. व संबंधीतांनी स्वत: किंवा अनेकांनी एकत्र येऊन गेली अनेक वर्षे ज्यांनी ह्या यंत्रणेचा एकतर्फी कामे, फायदे व कंत्राटे मिळविली, त्यांचे सर्वांना ज्ञान होईल व ते काम नवीन होतकरु व गरजु लोकांना निश्चितपणे मिळेल ह्यावर विश्वास हळूहळू बसल्याशिवाय राहणार नाही.

एकदरीत निसंकोच, आत्मविश्वास, कोणासही न घाबरता हा कायदा वाचणे, समजावून घेणे व त्याची वेळेच्यावेळी अंमलबजावणी करण्यासाठी माहिती मिळविणे व माहिती मिळविल्यानंतर सतत पाठलाग करुन संबंधितांचे धोबीपछाड करुन आपल्या शिक्षणाचा, कष्टाचा, जिद्दीचा व अनुभवाचा फायदा आपणा सर्वांना मिळेल व हळूहळू आर्थिक उत्थानाचे खरे स्वातंत्र्य आपणांस मिळेल यात शंका नाही.

सोबतच्या पानावर माहितीचा अधिकार कायदा – २००५ अंतर्गत कसा अर्ज करायचा व  हा अर्ज करुनही माहिती मिळाली नाही तर अपिल कसे करायचे याचे नमुने छापले आहेत याची कृपया नोंद घ्यावी.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**